




दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

**वर्ष : ०४**, अंक : २३९
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, गुरुवार, दि.१० एप्रिल २०२५







## धक्कादायक... ऐकावे ते नवलच...

## ४० हजार रुपयांसाठी ६ तास मृतदेह ठेवला अडवून...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, बुलडाणा :** दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातले डिपॉझिट मागण्याचे प्रकरण ताजे असताना बुलढाण्यातही असाच एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मलकापुर शहरातील हकिमी मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पिटलमध्ये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेतून शस्त्रक्रिया करण्यात आली. पण रुग्णाचा मृत्यू झाला. त्यानंतर त्यांच्या नातेवाइकांना ४० हजार रुपयांची मागणी केल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. शिवाय मृतदेह तब्बल सहा तास अडकून ठेवल्याचा दावा ही या कुटुंबीयांनी केला आहे. ही माहिती ज्यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे शहरप्रमुख गजानन ठोसर,माजी नगराध्यक्ष ॲड हरीश रावळ यांनी हॉस्पिटल प्रशासनाला जाब विचारला त्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. मलकापूर तालुक्यातील शिराढोण येथील कमलबाई यादव इंगळे




या घरात पाय घसरून पडल्या होत्या. त्यांचे वय ६८ वर्ष होते. त्यांचा डावा हात आणि पाय यात फ्रॅक्चर झाला. त्यांना मलकापूर येथील हकिमी मल्टी स्पेशालिस्ट हॉस्पिटल मध्ये उपचार करण्यासाठी दाखल करण्यात आलं होतं. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेतून ०७ एप्रिल रोजी रात्री त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. रुग्णालयात उपचार सुरू असतांना ९ एप्रिलला सकाळी ४ वाजता त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्यात त्यांचा मृत्यू झाला.

त्यानंतर रुग्णालय प्रशासनाने चाळीस हजार रुपये बिल बाकी असल्याचे त्यांच्या नातेवाईकांना सांगितलं. पैसे भरा आणि मृतदेह ताब्यात घ्या असं रुग्णालय प्रशासनाने सांगितल्याचा दावा इंगळे कुटुंबियांनी केला आहे. त्यानंतर आपण रुग्णालय प्रशासनाला मृतदेह देण्याची विनंती केली. पण तरी ही काही झाले नाही. शेवटी त्यांनी शिवसेना शहर प्रमुख गजानन ठोसर, माजी नगराध्यक्ष ॲड हरीश रावळ यांना फोन मतद मागितली. शहरातील ठाकरे गटाच्या शिवसैनिकांनी तात्काळ हॉस्पिटलमध्ये धाव घेतली. मृतदेह अडकवून ठेवण्याचा जाब विचारत हॉस्पिटलची तोडफोड करण्याचा इशारा दिला. त्यानंतर मृतदेह उचलून नातेवाईकांच्या ताब्यात दिला.

याबाबत मात्र हॉस्पिटल प्रशासनाने या आरोपांचं खंडन केल आहे. सदर महिलेचे अनेक कागदपत्र जमा करणे बाकी होते. या महिलेचे शासनाकडून अप्रुव्हल घेणे बाकी असल्याने कागदी प्रक्रिया करण्यास वेळ लागल्याने मृतदेह देण्यास विलंब झाल्याचं हॉस्पिटल प्रशासनाने म्हटलं आहे. मात्र आम्ही रुग्णाच्या नातेवाईकांना चाळीस हजार रुपये मागितले नाही. असेही रुग्णालयाचे कार्यकारी अधिकारी अनुप मालपाणी यांनी म्हटलं आहे.

## रान डुक्कर आडवं आल्याने अपघात, अख्ख कुटुंब संपलं...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, वर्धा :** कार आणि टँकरमध्ये झालेल्या धडकेत अखखं कुटुंब संपलं आहे. वर्ध्याच्या समुद्रपूर तालुक्यातील मांडगाव येथून आपल्या कुटुंबासह वर्ध्याकडे कारने येत असलेल्या पोलीस कर्मचाऱ्याच्या गाडीचा अपघात झाला आहे. यात चौघांचा मृत्यू झाला आहे. मंगळवारी मध्यरात्री हा भीषण अपघात झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस कर्मचारी प्रशांत वैद्य हे आपल्या कुटुंबासह रामनवमीच्या कार्यक्रमात सहभागी होण्याकरता कुटुंबासोबत गेले होते. कार्यक्रम आटोपून परत येत असताना हा अपघात झाला.

प्रशांत वैद्य हे आपल्या कुटुंबियांसह वर्ध्याकडे येत असताना हा अपघात झाला. रस्त्यावर रान डुक्कर आडवे आल्याने तरोडा गावाजवळ प्रशांत यांची कार अनियंत्रित झाली. त्यामुळे समोरून येणाऱ्या डिझेल टँकरला कार जाऊन धडकली.

या अपघातात प्रशांत वैद्य त्यांची पत्नी प्रियंका यांचा आणि मुलाचा (३ वर्ष) जागीच मृत्यू झाला.. तर मुलीचा (५ वर्ष) उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची माहिती समोर येत



आहे. अपघातात हसतं-खेळतं कुटुंब संपल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. पोलीस याबाबत अधिक तपास करत आहेत.

## पत्रकारांसाठी आरोग्य सुविधा, गृहनिर्माण आणि प्रवास सवलत...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, मुंबई :** राज्यातील पत्रकारांच्या विविध मागण्यांवर आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाची सह्याद्री अतिथिगृह येथे बैठक झाली. यावेळी पत्रकार सन्मान योजना, गृहनिर्माण, आरोग्य सेवा व प्रवास सवलती यासंदर्भात सविस्तर चर्चा झाली.

आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजनेतील अटींचा पुनर्विचार करत अनुभवाची अट ३० वर्षांवरून २५ आणि वयोमर्यादा ६० वरून ५८ वर्षांवर आणण्याच्या पत्रकार संघटनांकडून



आलेल्या मागणीनुसार, यासंदर्भात सुधारित प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री यांनी दिले. कांदिवलीतील पत्रकार गृहनिर्माण योजनेतील सदनिकांचे दर कमी करण्यासाठी म्हाडाने योग्य तो तोडगा काढावा, शंकरराव चव्हाण सुवर्णमहोत्सवी निधीअंतर्गत वैद्यकीय मदतीची मर्यादा वाढवण्याबाबत विचार करण्यात यावा, तसेच महात्मा फुले जनआरोग्य योजनेसोबत सुसंगत योजना तयार करून त्याद्वारे पत्रकारांना आरोग्य सुविधांचा लाभ मिळावा, यासाठी आवश्यक निर्णय घेण्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना एसटी महामंडळाच्या शिवनेरी व शिवाई बसमध्ये सवलत देण्यासंबंधी योग्य निर्णय घेण्यासही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. मंत्रालय प्रवेशासाठी सुरू करण्यात आलेल्या 'फेशियल रिकग्निशन' प्रणालीची अंमलबजावणी येत्या १५ दिवसांत पूर्ण करण्याचे निर्देश देखील त्यांनी दिले.

या बैठकीस मुख्य सचिव, पोलीस महासंचालक, अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव तसेच मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## राज्यातील ७८४ गावं-वाड्यांना टँकरने पाणीपुरवठा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, छ.संभाजीनगर :** एप्रिल महिन्याच्या सुरुवातीलाचा पाणीटंचाईची समस्या जाणूव लागली आहे. राज्यातील अनेक ठिकाणी पाण्याची कमी जाणवत आहे. त्यामुळे नागरिकांची तहान भागवण्यासाठी टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. विशेष म्हणजे एप्रिल महिन्याच्या सुरवातीलाच राज्यातील टँकरचा आकडा दोनशे पार गेला आहे.



राज्यात एकूण १४ जिल्ह्यांमधील ७८४ गावं-वाड्यांवर एकूण २२३ टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे. सर्वाधिक ६५ टँकर पुणे विभागात सुरू असून, सर्वाधिक ४० टँकर सातारा जिल्ह्यात सुरू आहेत. विशेष म्हणजे राज्यातील धरणांच्या पाणीसाठ्यात देखील झपाट्याने घट होत आहे.

राज्यातील २ हजार ५९९ लघु, मध्यम आणि मोठ्या प्रकल्पात ४३.६७ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. त्यामुळे आगामी काळात पाणी प्रश्न गंभीर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**मराठवाड्यातील ११ मोठ्या प्रकल्पातील पाणीसाठा...**

जायकवाडी : ४९.८६ टक्के
निम्न दुधना : ४२.०७ टक्के
येलदरी : ५९.३५ टक्के
सिद्धेश्वर : ६१.१० टक्के
माजलगाव : ३८.१३ टक्के
मांजरा : ४२.७४ टक्के
पैनगंगा : ५७.८१ टक्के
मनार : ५०.६३ टक्के
निम्न तेरणा : ६२.७१ टक्के
विष्णुपुरी : ३९.८७ टक्के
सीना कोळेगाव : १८.५१ टक्के

## थोडक्यात

## ...त्याशिवाय २ मुलांना जन्म शक्य नाही !

**अक्षराज : वृत्तसंकलन**



**दि.०९, मुंबई :** माजी मंत्री धनंजय मुंडे बीड जिल्ह्यातल्या सरपंच संतोष देशमुख यांची हत्या तसंच भ्रष्टाचाराच्या आरोपामुळे अडचणीत आहेत. या प्रकरणात त्यांना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागलाय. त्याचवेळी त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातील अडचणी देखील कायम आहेत. 'धनंजय मुंडे यांच्या आपण पहिल्या पत्नी असून त्यामुळे आपल्याला पोटगी द्यावी' अशी याचिका करुणा शर्मा यांनी दाखल केली होती. मुंबईच्या न्यायालयानं या प्रकरणात करुणा शर्मा यांच्या बाजूनं निकाल दिला होता. आता त्यापाठोपाठ सत्र न्यायालयानं देखील करुणा शर्मा यांना दिलासा देत मुंडे यांना धक्का दिला आहे.

**करुणा आणि धनंजय यांचे संबंध लग्नासारखेच...**

करुणा मुंडे आणि धनंजय मुंडे यांचे संबंध लग्नासारखेच आहेत, असं मत सत्र न्यायालयानं दिले आहेत. या दोघांनी दोन मुलांना जन्म दिला. हे एकाच घरात राहिल्याशिवाय शक्य नाही, असं महत्त्वाचं निरीक्षण सत्र न्यायालयानं नोंदावलं आहे.

धनंजय मुंडे यांची याचिका फेटाळून लावताना न्यायालयाने हे निरीक्षण नोंदावलं. करुणा मुंडे यांना २ लाख रुपयांची पोटगी देण्याच्या वांद्रे कोर्टाच्या निर्णयाला धनंजय मुंडे यांनी आव्हान दिलं होतं. आपल्या याचिकेत करुणा शर्मा यांच्याशी लग्न केलं नसल्याचा दावा मुंडे यांनी केला होता. धनंजय मुंडे आणि करुणा शर्मा यांच्यातील संबंध हे वैवाहिक स्वरुपाचे आहेत. त्यामुळे करुणा या घरगुती हिंसाचार कायद्यांतर्गत दिलासा मिळण्यास पात्र आहेत, असं मत सत्र न्यायालयानं नोंदवलं.

एका प्रसिद्ध नेत्याची जीवनशैली लक्षात घेऊन दंडाधिकाऱ्यांनी करुणा शर्मा यांना अंतरिम देखभालीचा दिलेला आदेश योग्यच आहे. करुणा आणि त्यांच्या मुलांनाही नेत्यासारखीच जीवनशैली मिळायला हवी, असे अतिरिक्त सत्र न्यायाधीश शेख अकबर शेख जाफर यांनी त्यांच्या आदेशांत स्पष्ट केले आहे.

**करुणा यांनी सादर केले होते पुरावे...**

यापूर्वी या प्रकरणाच्या माझगाव कोर्टात झालेल्या सुनावणीमध्ये करुणा मुंडे यांनी धनंजय मुंडे यांचं नाव मृत्यूपत्र सादर केलं. त्यामध्ये करुणा मुंडे यांच्या नावासमोर पहिली पत्नी तर राजश्री मुंडे यांच्या नावासमोर दुसरी पत्नी असा उल्लेख आहे, असा दावा त्यांनी केला. धनंजय मुंडे यांनी त्यावेळी आपल्याला पहिल्या पत्नीचा दर्जा दिल्याचा करुणा मुंडे यांनी दावा केला. त्याचबरोबर आम्ही २७ वर्ष सोबत राहिलो आहोत असंही त्यांनी कोर्टात सांगितलं. आमचं जॉईंट बँक अकाऊंट आहे. पॉलिसी आहे. परळी पोलिस ठाण्यात माझ्या लग्नाचे पुरावे देखील आहेत, असं करुणा यांनी स्पष्ट केलं. त्याचबरोबर त्यांनी यावेळी कोर्टात धनंजय मुंडे यांनी त्यांचा पत्नी असल्याचं स्विकृतीपत्रक देखील सादर केलं.

## संजय वाघुले व पदाधिकाऱ्यांनी घेतली पत्रकार विनोद वस्करांची भेट



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, ठाणे :** दिनांक ०८ एप्रिल २०२५ रोजी भारतीय जनता पार्टीचे ठाणे जिल्हा अध्यक्ष संजय वाघुले, ठाणे जिल्हा शहर सरचिटणीस मनोहर सुगदरे, ठाणे चिटणीस विजय भोईर,शिळ दिवा युवा मोर्चा अध्यक्ष साहिल पाटील, ठाणे जिल्हा उपचिटणीस सुनिल आलिमकर, शिळगावचे पोलीस पाटील संतोष भोईर आणि ग्रामस्थांनी दैनिक अक्षराज चे पत्रकार विनोद वास्कर यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली. त्यांच्या तब्येतीची चौकशी केली. पत्रकार संरक्षण कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वनमंत्री गणेश नाईक यांना स्वतः संजय वाघुले निवेदन देणार आहेत असे समजले. शिळ ग्रामस्थांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार आहे. भारतीय जनता पार्टीचा पूर्ण पाठिंबा ग्रामस्थांना असणार आहे. यावेळी त्यांनी नयाब तहसीलदार यांना फोन लावले. ठाणे पोलीस डीसीपी यांना सुद्धा फोन लावले त्यांची भेट घेणार असल्याचे स्पष्ट केले. विनोद वास्कर यांना न्याय मिळवून देणार असे संजय वाघुले यांनी यावेळी पत्रकार विनोद वास्कर यांना आश्वासन दिले.

# संपादकीय



## होम लोनचा EMI झाला कमी!

आपलं स्वप्नातील घर बांधण्याचं किंवा खरेदी करण्याचं प्रत्येकाचं स्वप्न असतं. पण, महागाईच्या सध्याच्या युगात घर घेणं हे अवघड होत आहे. त्यामुळेच सर्वसामान्य नागरिक घर खरेदी करण्यासाठी होम लोनचा आधार घेतो.

होम लोनच्या माध्यमातून तुम्ही घराची किंमत हप्त्यामध्ये चुकवता. त्यामध्ये लोनच्या व्याजाचाही समावेश असतो. हप्त्यामध्ये लोन चुकवलं तर तुमच्यावरी आर्थिक ओझं कमी होतं. तसंच सेव्हिंगवर देखील प्रभाव पडत नाही.

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आज (९ एप्रिल) मॉनिटरी पॉलिसी कमिटीच्या बैठकीत रेपो दरात कपात करण्याची घोषणा करण्यात आली आहे. रिझर्व्ह बँकेनं अपेक्षेप्रमाणे रेपो दरात पाव टक्क्यांची कपात केली आहे.

जागतिक अर्थकारणाचा भारतीय अर्थव्यवस्थेला फटका बसेल, पण तो मर्यादीत असेल असंही रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीनं तीन दिवस केलेल्या चर्चेतून पुढे आलं. त्यामुळे चालू आर्थिक वर्षाच्या विकासाचा दर ६.७ टक्क्यांवर कमी करुन ६.५ टक्क्यांवर आणण्यात आला. तुमच्या गृहकर्जाचा व्याजाचा दर ८.२५ टक्के असेल, आणि काळ २० वर्ष असेल, तर २० लाखाच्या कर्जासाठी वर्षाकाठी ३ हजार ७४४ रुपयांची बचत होणार आहे. ३० लाखांच्या कर्जासाठी वर्षाकाठी ५ हजार ६२८ रुपयांची बचत होईल. तर ५० लाखांच्या कर्जासाठी वर्षाकाठी ९ हजार ३७२ रुपये वाचणार आहेत.

रेपो दरात कपात करुन रिझर्व्ह बँक थांबलेली नाही. भविष्यातील आर्थिक निर्णयासंदर्भात रिझर्व्ह बँकेनं आपलं धोरण सुद्धा बदललंय. आतापर्यंत न्यूट्रल म्हणजे समसमान शक्यताचा विचार करणाऱ्या पतधोरण समितीनं त्यांची विचारसणी अकॉमोडेटिव्ह किंवा उदार केली आहे. याचा अर्थ नजीकच्या भविष्यात व्याजदर स्थिर राहतील किंवा खाली येतील. अस्थिर जागतिक अर्थकारणाच्या पार्श्वभूमीवर स्टान्स बदलण्याचं पाऊल अत्यंत महत्वाचं ठरणार आहे.

रिझर्व्ह बँकेनं धोरण बदलल्यानं आता पतधोरणाची दिशा महागाई नियंत्रण नसून अर्थव्यवस्थेच्या विकासाला बळ देणे ही असणार आहे. जागतिक आर्थिक वादळाच्या स्थितीत आपलं जहाज भरकटू द्यायचं नसेल, तर RBI ने उचचलेलं हे पाऊल योग्य वेळी उचलेललं योग्य पाऊल ठरेल अशी सध्याची स्थिती आहे.

## 'ज्ञानकुल'च्या ज्ञानोत्सवात यंदा 'अखंड भारत' संकल्पनेवर प्रदर्शन

**दि.०९, मुंबई :** भौतिक शिक्षणासोबत विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीचे शिक्षण देणाऱ्या चेंबूर येथील ज्ञानकुल बाल विकास संघाचा प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी दिनांक १० ते १२ एप्रिल या कालावधीत वार्षिकोत्सव अर्थात ज्ञानोत्सव साजरा होत आहे. यंदा 'अखंड भारत' या संकल्पनेवर आधारित हा महोत्सव साजरा होणार आहे. संकल्पनेला अनुसरून भारतात होऊन गेलेले राजे-महाराजे क्रांतिकारक, संत, वीरांगना, कर्तृत्ववान महिला, भारतीय संस्कृतीचे प्रमुख वौशिष्ट्य असलेले प्राचीन ग्रंथ इत्यादी विषयांवर प्रदर्शन मांडण्यात येणार आहे. या प्रदर्शनातून भारतीय विचार, सकारात्मक दृष्टीकोन, संस्कृती आणि भारताचा ५००० वर्षांचा इतिहास समाजापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न ज्ञानकुलचे विद्यार्थी करणार आहेत. हा ज्ञानोत्सव सकाळी नऊ ते दोन या वेळेत ज्ञानकुल बाल विकास संघ,चेंबूर या ठिकाणी साजरा होणार आहे. दूरदर्शन मालिकाविश्वात विक्रम प्रस्थापित करणाऱ्या 'महाभारत' मालिकेतील 'भीष्म पितामह' यांची अजरामर भूमिका साकारणारे अभिनेते मुकेश खन्ना या प्रदर्शनाला विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

# अहिंसेचे प्रतीक भगवान महावीर


जैन धर्माचे चोविसावे तीर्थांकार अहिंसेचे मूर्तिमंत प्रतीक भगवान महावीर यांची आज जयंती. भगवान महावीर यांचा जन्म वैशाली राज्याच्या कुंडलपूर येथे इसवी सन पूर्व ५९९ मध्ये झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सिद्धार्थ तर आईचे नाव त्रिशला असे होते. त्यांच्या भावाचे नाव नंदिवर्धन तर बहिणीचे नाव सुदर्शना असे होते. त्यांचे बालपण राजेशाही थाटात गेले. भगवान महावीर आठ वर्षाचे असताना त्यांना शिक्षण आणि शस्त्र विद्येचे प्रशिक्षण घेण्यासाठी शाळेत पाठवण्यात आले. भगवान महावीरांचे कुटुंब जैनांचे तेविसावे तीर्थांकार भगवान पार्श्वनाथ यांचे अनुयायी होते. भगवान महावीर २८ वर्षाचे असतानाच त्यांच्या आईवडीलांचे निधन झाले त्यानंतर त्यांनी श्रामणी दीक्षा घेतली आहे. त्यानंतर काही दिवसांनी त्यांना आत्मज्ञान प्राप्त झाले. त्यांनी १२ वर्ष मौन पाळले. हटयोग्याप्रमाणे त्यांनी शरीराला कष्ट दिले. ज्ञानप्राप्तीनंतर



त्यांनी जनकल्याणासाठी उपदेश देण्यास सुरुवात केली त्यासाठी त्यांनी त्याकाळी प्रचलित असणारी अर्धमागधी भाषेचा आधार घेतला. इंद्रिय व विषय वासनेचे सुख दुसऱ्याला दुःख देऊनच मिळवता येते असे त्यांचे मत होते त्यामुळेच त्यांनी जैन धर्माच्या अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह याबाबींमध्ये ब्राम्हचर्याचाही समावेश केला. त्याग, संयम, प्रेम, करुणा, शील व सदाचार हे त्यांच्या प्रवचनाचे सार होते. त्यांनी चतुर्वेध संघाची स्थापना करुन समता हेच जीवनाचे लक्ष असल्याचे सांगितले. देशात ठिकठिकाणी फिरून भगवान महावीरांनी या पवित्र संदेशाचा प्रसार केला. इसवी सन पूर्व ५२७ मध्ये बिहार मधील पावापुरी येथे वयाच्या ७२ व्या वर्षी त्यांचे निर्वाण झाले. तो दिवस होता कार्तिक कृष्ण अमावस्येचा. भगवान महावीरांच्या जन्म आणि निर्वाण दिनादिवशी घराघरात दिवे लावले जातात. भगवान महावीर म्हणतात की, जाणते किंवा अजाणतेपणातून कोणाची हिंसा करणे योग्य नाही. याशिवाय दुसऱ्याच्या मार्फतही कोणाची हिंसा घडवून आणू नये कुठल्याही जीवांना मन, शरीर किंवा बोलण्याने दंडित करू नये. सर्वांच्या आत एकच आत्मा आहे. आपल्या प्रमाणेच प्रत्येक प्राण्यांना आपापले प्राण प्रिय आहे त्यामुळेच कोणत्याही प्राण्यांप्रति हिंसा करू नये. स्वतः हिंसा करणारा, दुसऱ्यांकडून हिंसा घडवून आणणारा व दुसऱ्याने केलेल्या हिंसेचे समर्थन करणारा स्वतःप्रति द्वेष वाढवत असतो असे तेच मत होते. कोणत्याही प्रकारची हिंसा न करणे हीच ज्ञानाची खरी परिभाषा आहे. अशाप्रकारे त्यांनी ज्ञानाची व्याख्या केली आहे. आपल्या आत्म्याविषयी असणारा भाव इतर प्राण्यांविषयी असू द्या. सर्व प्राणिमात्रांविषयी अहिंसेचा भाव राखा मन, वाणी आणि शरीराने कोणाचीही हिंसा न करणारा खरा संयमी म्हणून गणला जातो अशी संयमी माणसाची व्याख्या त्यांनी केली. चालताना, बसताना, बोलताना, जेवण करताना असावध असणारा, स्वतःची पूर्ण खात्री झाल्याशिवाय, पहिल्या व विचार केल्याशिवाय कृती करणारा हिंसा करत असतो असे त्यांचे मत होते. दुःखास सर्वच जीव घाबरत असतात हे लक्षात घेऊन कोणत्याही जीवास कष्ट पोहचवणे टाळावे असे ते आपल्या प्रवचनात नेहमी सांगत.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## महावीर जयंती..



तेवीसावे धर्म रक्षक
तीर्थंकर रे पार्श्वनाथ
चातुर्याम धर्म सांगे
चार तत्वे आत्मसात

ब्रह्मचारी ते महावीर
विश्वासले सत्कर्मात
रूपांतरी करी सार्थ
पंचयामी या धर्मात

चार तीर्थे स्थापियले
तीर्थंकर रे म्हणतात
त्याग प्रेम न् सदाचार
सत्व तत्व जाणतात

अहिंसा सत्य अस्तेय
ठसवे विचार मनात
संयम करूणा शील
प्रसार करती जनात

अनेकांत वादाचा रे
तथ्य आणे विचारात
स्याद्वादाचे पुरस्कार
कृत्य आणे आचारात

सहज समजावे धर्म
अर्धमागधी याभाषेत
महिलांनाहीअधिकार
समाज ये एक रेषात


तितिक्षा क्षमाअहिंसा
गुण रूजवावे अंगात
समता न् त्यागभावना
उजवावे गा अंतरंगात

उपवास निर्जल करी
पावन पर्युषण पर्वात
चैत्र शुद्ध त्रयोदशीला
महावीर जयंती गर्वात

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# जितेंद्रीय भगवान महावीरांचे तत्वज्ञान



जैन परंपरेत असे मानले जाते की, सहाव्या शतकाच्या पूर्वार्धात महावीरांचा जन्म आजच्या बिहार, भारत मधील कुंडलपूर येथे राजा सिद्धार्थ व राणी त्रिशलामाता यांचेपोटी क्षत्रिय कुटुंबात झाला. वयाच्या तिसाव्या वर्षी त्यांनी सर्व ऐहिक संपत्ती , संसार व राजपाट याचा त्याग केला. आध्यात्मिक जागृतीचा प्रसार व आत्मकल्याण करण्यासाठी जैन दिक्षा घेऊन ते एक तपस्वी बनले. 'अहिंसा परमो धर्मः' या विचारांचे प्रणेते भगवान महावीर यांना वीर , अतिवीर , सन्मति आणि वर्धमान म्हणूनही ओळखले.भगवान महावीर जैन जैन धर्माचे चोवीसावे तीर्थंकर होते . त्यांनी जैन धर्माचे पुनरुत्थान केले. त्यांनी पूर्व-वैदिक काळातील पूर्वीच्या तीर्थंकरांच्या आध्यात्मिक, दार्शनिक आणि नैतिक शिकवणींचा विस्तार केला. महावीरांनी बारा वर्ष महान तप आणि आत्मध्यान केले. त्यानंतर त्यांनी केवलज्ञान प्राप्त केले.तीस वर्षे भारतभर त्यांनी जैन तत्त्वज्ञानाचा प्रचार केला.या काळात त्यांनी जगासमोर तत्वज्ञान मांडले. त्याला पंचमहाव्रते म्हटले जाते. अगदी साध्या व सोप्या भाषेत मांडलेले हे तत्वज्ञान मानवी जीवनात जणू एका धर्म ग्रंथाचा सार सांगून जातं. कारण मनुष्य म्हणून जगतांना दैनंदिन व्यवहारात केवळ पंच महाव्रतांचा जरी अवलंब केला तरी, जीवनाचे कल्याण झाल्याशिवाय राहणार नाही. वर्धमान महाविरांनी जे पंच महाव्रते सांगितले त्यापैकी प्रथम म्हणजे सत्य -- सत्य म्हणजे नेहमी खरे बोलावे. त्याचबरोबर सत्याची कास धरावी. समाजातील सत्य जाणून घेण्याचा प्रयत्न करावा. सत्यामुळे विवेक जागृत होतो.व त्यातून वैज्ञानिक दृष्टिकोन जागृत होतो अन वैज्ञानिक दृष्टिकोन जागृत झाला तर मनुष्य अंधश्रद्धा,वाईट विचार याला बळी पडत नाही.भगवान महावीर स्वामी म्हणतात,हे मानवा! तुम्ही खऱ्याला खरे माना व त्याचप्रमाणे जो ज्ञानी सत्याचे पालन करून सत्याचेच ज्ञान दान करतो,कारण प्रत्येक मनुष्याला सर्वच ज्ञान नसते म्हणून जेव्हा आपल्याला ज्या क्षेत्राविषयी ज्ञान आहे ते जगासमोर सत्य ज्ञान मांडावे. त्यातून मानव कल्याण तर होईलच पर्यायाने विश्व कल्याण होईल असे वर्धमान महावीर म्हणतात.भगवान महाविरांनी सांगितलेले दुसरे महा व्रत म्हणजे अहिंसा - अहिंसा म्हणजे कोणत्याही जीवाची मन,वाचा अथवा काया म्हणजेच शरीराद्वारे हत्या करू नये.हिंसा करू नका, त्यांना त्यांच्या मार्गावर जाण्यापासून रोखू नका. त्यांच्याबद्दल आपल्या अंतःकरणात करुणेची भावना ठेवा. अहिंसा परमो धर्म या तत्वा विषयी सांगतांना भगवान महावीर म्हणतात, धर्म म्हणजे आचरण. आपले आचरण हे हिंसे विना असावे.सकाळी उठल्या पासून आपल्या हातून शरीराने कुठल्याही प्राणीमात्राची हिंसा अथवा हत्या होता कामा नये. आपली वाणी अर्थात बोलणे एवढे मधुर असावे कि त्यातून सतत प्रेमाचा वर्षाव व्हावा कुणाचा राग द्वेष मत्सर होता कामा नये. हे कार्य वाणीतून तर व्हायला नकोच त्याचबरोबर अश्या स्वरूपाचे वाईट चिंतन आपल्या मनाने सुद्धा करायला नको.म्हणून काया वाचा मन यातून कुठल्याही प्राणीमात्राची हिंसा व्हायला नको त्यातून जगातील समस्त प्राणीमात्र सुखा समाधानाणे जीवन जगतील.हाच अहिंसेचा संदेश भगवान महावीर आपल्या शिकवणीतून देतात.

भगवान महावीर यांचे तिसरे महाव्रत म्हणजे अस्तेयं - अस्तेय म्हणजे चोरी करू नये. जी वस्तू आपल्या स्वतः च्या हक्काची अथवा मालकीची नाही. संबंधित व्यक्तीची वस्तू त्याच्या अपरोक्ष स्वीकारणे किंवा त्याच्या वस्तूंची मनात अभिलाषा ठेवणे. याला अस्तेय म्हटले आहे. जी वस्तू मालकी हक्काप्रमाणे कुटुंबातील भाऊ नातेवाईक अथवा मित्रांची असली तरी तिच्या विषयी अभिलाषा बाळगू नये अशी शिकवण भगवान महावीर आपणांस देत आहे.या माध्यमातूम व्यक्तींचा व्यक्तीवर विश्वास दृढ होईल. व समाजात अराजकता न माजता आनंदी व प्रसन्न वातावरण राहील. भगवान महावीर यांचे चवथे महा व्रत म्हणजे अपरिग्रह -अपरिग्रह म्हणजे द्रव्यसंग्रह करू नये, स्वार्थी वृत्तीचा त्याग करावा. कारण हे सर्व परमेश्वर रचित आहे. अति सूक्ष्म विचार केल्यास येथील कुठल्याही वस्तूवर पूर्ण अधिकार नाही. जो माणूस स्वतः सजीव किंवा निर्जीव वस्तू गोळा करतो, इतरांकडून असा संग्रह करतो किंवा इतरांना ते गोळा करण्याची परवानगी देतो, तो कधीही दुःखापासून मुक्त होऊ शकत नाही. हाच संदेश भगवान महावीरांना अपरिग्रहाद्वारे जगाला द्यायचा आहे.भगवान महावीर यांनी सांगितलेल्या पंच महाव्रता पैकी अंतिम अर्थात पाचवे महाव्रत म्हणजे ब्रह्मचर्य-म्हणजेच मनामध्ये कामवासना बाळगू नये. महावीर स्वामी ब्रह्मचर्य बद्दल त्यांचे अत्यंत अमूल्य उपदेश देतात की ब्रह्मचर्य हे परिपूर्ण तपस्या, नियम, ज्ञान, तत्त्वज्ञान, चारित्र्य, संयम आणि नम्रता यांचे मूळ आहे. मैथुन संसाराचा मूळ गाभा आहे कारण त्यामुळे गृहस्था श्रम टिकून राहतो. त्यातून प्रजनन संस्था कायम राहते. मात्र त्यामध्ये व्याभिचार नसावा. पतीने पत्नी सोबत व पत्नी ने पती सोबत एकनिष्ठ रहावे. मुनि, तपस्वी यांचे ब्रह्मचर्य हेच श्रेष्ठ तप आहे,त्यामुळे त्यांची,मोक्षमार्गाकडे वाटचाल होते.

धर्म आणि संस्कृती ही उत्क्रांत मानवी जीवनाची प्रधान अंगे आहेत.आणि या मूलतत्वाची जाणीव ठेवुन मनुष्य प्राणी यांनी जीवन व्यथित करायला हवे. हे तत्वज्ञान समस्त मानवी जीवनाचे कल्याण करण्यासाठी भगवान महावीर यांनी जगासमोर प्रस्थापित केले. संपूर्ण मानव जातीला मानवतेची शिकवण देऊन शांती,अहिंसा, प्रेम, त्याग ब्रम्हचर्य यांची शिकवण दिली व इंद्रयांवर विजय मिळवून जितेंद्रिय झाले.

**अश्या या महान तपस्वीला जयंती निमित्त विनम्र अभिवादन...!**

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.९७६३२८२०७७**

# वंचित घटकांपर्यंत शिक्षणाची गंगा पोहचविणे अत्यावश्यक - अनमोल सागर

**दि.०९, ठाणे :** भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या चाविन्द्रा येथील घनकचरा प्रक्रिया केंद्रानजीक डोंगरीपाडा येथील कचरा वेचक समुदायाच्या लोकवस्तीमध्ये नवजीवन लोकविकास संस्था या सामाजिक संस्थेमार्फत कचरावेचक मुलांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध शैक्षणिक उपक्रमांची आज महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक अनमोल सागर यांनी पाहणी केली. यावेळी कचरा वेचक मुलांसाठी दोन वयोगटात घेण्यात असलेले मुलभूत शिक्षण अध्ययन वर्ग, वाचनालय, कचरावेचक मुलांनी तयार केलेल्या कलावस्तु आदींची पाहणी करून आयुक्त यांनी या उपक्रमांचे कौतुक केले.



यावेळी अनौपचारिकपणे बोलताना त्यांनी सांगितले की, कचरा वेचकांसारख्या वंचित घटकांपर्यंत शिक्षणाची गंगा पोहविचणे हे त्यांच्या मुलांच्या भविष्यासाठी आत्यंतिक आवश्यक आहे. सदर मुलांची महानगरपालिकेच्या शाळांमध्ये पटनोंदणी केली असून अशा समाजोपयोगी उपक्रमांस महानगरपालिकेतर्फे आवश्यक ते पाठबळ उपलब्ध करून देण्यात येईल अशी ग्वाही देखील त्यांनी दिली.

यावेळी महानगरपालिका उपायुक्त (शिक्षण) बाळकृष्ण क्षीरसागर, सहायक आयुक्त (शिक्षण) डॉ.अनुराधा बाबर, प्रशासन अधिकारी नितीन पाटील, संस्थेच्या शिक्षणाधिकारी सौ.पूजा ठोकळे, समन्वयक उषा वाघमोडे आदी उपस्थित होते.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# ७/१२ वरील मयतांची नावे हटून वारसांची नोंदी होणार : आ.दाते

## शासनाच्या जिवंत सातबारा मोहिमेचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०९, पारनेर (अहिल्यानगर) :** शेतीच्या मालकीहक्कात अडथळा आणणाऱ्या मयत खातेदारांच्या नावांची ७/१२ उताऱ्यावरून नोंद कमी करण्यासाठी मोठा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली १ एप्रिल पासून संपूर्ण महाराष्ट्रात 'जिवंत सातबारा मोहीम'' राबवली जाणार असल्याची माहिती पारनेर – नगर विधानसभा मतदारसंघातील आमदार काशिनाथ दाते यांनी दिली असून शासनाच्या या निर्णयाचा शेतकऱ्यांनी फार मोठ्या प्रमाणात फायदा घ्यावा असे आवाहन ही आमदार दाते यांनी केले. या निर्णयामुळे सातबाऱ्यावर वारसांची



अधिकृत नोंदणी होवुन खरेदी–विक्री व्यवहारात येणारे अडथळे दूर होतील. शेतीविषयक कर्ज मिळवणे सोपे होईल. वारसांमध्ये मालकी हक्क संदर्भातील कायदेशीर वाद टाळता येतील.

**प्रशासनाची जबाबदारी तहसीलदार तालुका स्तरावर समन्वय साधतील, जिल्हाधिकारी संपूर्ण मोहीम वेळेत पार पडेल याची जबाबदारी सांभाळणार असून विभागीय आयुक्त देखरेख ठेवणार आहेत. महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवस कृती आराखडा कार्यक्रम अंतर्गत जिवंत सातबारा मोहीम राबवणे बाबतच्या निर्णय राज्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी असून आमदार काशिनाथ दाते यांनी शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.**

शासन निर्णयानुसार १ ते ५ एप्रिल पर्यंत तलाठी गावनिहाय मयत खातेदारांची यादी तयार करून चावडी वाचन करतील. ६ ते २० एप्रिल दरम्यान वारसांना आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करण्याची संधी मिळणार आहे. २१ एप्रिल ते १० मे ई–फेरफार प्रणालीद्वारे सातबाऱ्यावर वारसांची अधिकृत नोंदणी केली जाणार आहे. यासाठी अर्ज करताना आवश्यक कागदपत्रे मृत्यू दाखला, वारस प्रमाणपत्र किंवा स्वयंघोषणा प्रतिज्ञापत्र, पोलिस पाटील, सरपंच किंवा ग्रामसेवक यांचा दाखला, सर्व वारसांची माहिती (नाव, वय, पत्ता, मोबाईल क्रमांक), रहिवासी पुरावा, संपूर्ण प्रक्रिया मोफत असुन कोणत्याही दलालाला किंवा अधिकाऱ्याला पैसे देऊ नका असे महसूल विभागाने जाहीर केले आहे.

# दिवा, कळवा व मुंब्रा भागातील नागरी समस्यांबाबत ठाकरे गटाची आयुक्तांशी बैठक

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि. ०९, दिवा (ठाणे) :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे कल्याण जिल्हा प्रमुख दीपेश पुंडलीक म्हात्रे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने ठाणे महानगरपालिका आयुक्तांची भेट घेऊन दिवा, कळवा व मुंब्रा येथील नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांबाबत चर्चा केली. या चर्चावेळी आयुक्तांची प्रमुख मागण्या सांगण्यात आल्या –

१) दिवा शहरासाठी स्वतंत्र जलपुरवठा योजना

२) अनधिकृत डंपिंग व बांधकामांवर कारवाई



३) स्वतंत्र सांडपाणी प्रक्रिया केंद्र (STP)

४) दिवा आगासन रोड वरील रेल्वे क्रॉसिंग वर उड्डाणपूल बनविण्यात यावे.

५) कळवा ृझ मधील त्रुटींवर उपाय व पुनर्वसन

६) वाहतूक कोंडी व प्रदूषणावर तातडीने उपाय

७) कळवा छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील खउण व छखउण तसेच आरोग्य सुविधांमध्ये वाढ करावी

आयुक्तांनी सर्व मुद्दे गांभीर्याने ऐकून घेतले असून, सकारात्मक कृतीचे आश्वासन दिले आहे. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना तात्काळ कारवाई करण्याचे आदेशही दिले. यावेळी कल्याण जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे कल्याण जिल्हा संघटक तात्यासाहेब माने, कल्याण जिल्हा संघटिका वैशाली दरेकर राणे, कल्याण जिल्हा युवा अधिकारी प्रतीक पाटील, अंकिता पाटील, सचिन पाटील, रोहिदास मुंडे, ज्योती पाटील, अभिषेक ठाकूर, तेजस पोरजी, स्मिता जाधव, विजय कदम, खूरेशी शाईन घडीयाळी, लहू चाळके, रवींद्र सुर्वे, कल्पना कवळे, शनिदास पाटील, संजय जाधव, रवी रसाळ तसेच सर्व शाखा प्रमुख आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# आजपासून पळसपूर येथे क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०९, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील पळसपूर परिसरातील प्रसिद्ध असलेल्या श्री भगवती देवी मातेच्या यात्रेनिमित्त ग्रामस्थांच्या व श्री भगवती देवी क्रिकेट क्लब यांच्या वतीने भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.




पळसपूर प्रिमियर लिग २०२५ , भगवतीदेवी चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन आज गुरुवार, दि.१० एप्रिल ते १२ एप्रिल सकाळी १० वाजता नविन ग्राउंड येथे केले आहे, अशी माहिती उद्योजक संजयशेठ आहेर व पळसपूर ग्रामस्थांनी दिली. या कार्यक्रमास आमदार काशिनाथ दाते, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील, शिवसेना पारनेर तालुकाप्रमुख डॉ.श्रीकांत पठारे व माजी नगराध्यक्ष विजुभाऊ औटी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या स्पर्धेचे हे १४ वे वर्ष आहे. तसे पाहिले तर पळसपूर हे गाव पहिल्यापासूनच क्रिकेटप्रेमी म्हणून ओळखले जाते. पळसपूर या ग्रामीण भागातील गावामध्ये पूर्वीपासूनच क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

या स्पर्धेतील प्रथम विजेत्या संघास जालिंदर आहेर, संजय आहेर, संजय कुंडलिक आहेर यांच्या वतीने २१ हजार रुपये, उपविजेत्या संघास द्वितीय पारितोषिक भाऊसाहेब रेपाळे यांच्या वतीने १५ हजार रुपये, तृतीय पारितोषिक दत्ताशेठ आहेर, सचिन आहेर, तुषार आहेर यांच्या वतीने १० हजार रुपये देण्यात येणार आहे. त्याशिवाय उत्कृष्ट फलंदाज, मॅन ऑफ द मॅच, चौकार हॅटट्रिक, षटकार हॅटट्रिक, विकेट हॅटट्रिक ,गोलंदाज, क्षेत्ररक्षक, यष्टिरक्षक, मालिकावीर, अंतिम सामनावीर, पंच, समालोचक, स्मृतिचिन्ह, आदी रोख रक्कम आणि ट्रॉफी अशी बक्षीसांची लयलूट असणार आहे. समालोचक म्हणून मयुर शिंदे, गोकुळ आहेर, तुषार शिंदे व प्रविण आहेर हे असणार आहेत.

या स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभ शनिवार, दि. १२ एप्रिल रोजी प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत पळसपूर येथे करण्यात येणार आहे. या स्पर्धेत जास्तीत जास्त संघांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक संजय आहेर व श्री भगवती देवी क्रिकेट क्लब यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी आयोजक श्री भगवती देवी क्रिकेट क्लब पळसपूर यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# भोसे येथील दुध भेसळ प्रकरणातील फरार आरोपी अटकेत









**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०९, पंढरपूर :** पंढरपूर तालुक्यातील भोसे या ठिकाणी होत असलेल्या दूध भेसळ प्रकरणी करकंब पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर प्रकरणातील आरोपी हे फरार होते. करकंब पोलिसांना या आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहेत.

दिनांक २० फेब्रुवारी २०२५ रोजी करकंब पोलीस ठाणे सहायक पोलीस निरिक्षक, सागर कुंजीर यांना गोपनिय बातमीदारा मार्फत मौजे भोसे ता.पंढरपूर गावचे हद्दीत भेसळ युक्त दुध तयार करून त्याची वाहतुक होत असले बाबत बातमी मिळाली होती. त्या अनुषंघाने अन्न व औषध प्रशासन, यांचे मदतीने छापा कारवाई करून मुख्य आरोपी दत्तात्रय महादेव जाधव रा.भोसे, ता.पंढरपुर याचे मालकीचे जागेतुन कृत्रीम दुध बनविण्यासाठी लागणारा कच्चा माल मोठ्या प्रमाणात जप्त करण्यात आला होता. त्याअनुषंघाने करकंब पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ५०/२०२५ भा. न्या.सं. २०२३ चे कलम १२३,२७४,२७५,३(५) सह अन्न सुरक्षा व मानदे कायदा कलम ३ (१) (र), ३ (१) (नन) (त), २६(१), २६(२) (१), २६(२) (त), २७ (१), चे उल्लघन करून शिक्षापात्र कलम ५९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयात आरोपी सचिन अरुण फाळके, वय ३१ वर्षे, रा. पांढरेवाडी, ता.पंढरपुर यास अटक करण्यात आली होती. व इतर मुख्य आरोपी दत्तात्रय महादेव जाधव, त्याची पत्नी सोनाली दत्तात्रय जाधव दोघे रा.भोसे, ता.पंढरपूर तसेच अनिकेत बबन कोरके रा.सुगाव भोसे, ता.पंढरपूर पृथ्वीरात उर्फ सोन्या नवनाथ शिंदे रा. पांढरेवाडी ता.पंढरपूर हे फरार होते. गुन्हयाचा तपास डॉ.अर्जुन भोसले, उप–विभागीय पोलीस अधिकारी, पंढरपूर हे करीत असताना तांत्रीक तपास व गोपनीय बातमीदार यांचे मदतीने मुख्य आरोपी दत्तात्रय महादेव जाधव, त्याची पत्नी सोनाली दत्तात्रय जाधव हे दोघे खाटुबडी राजस्थान येथे असल्याची बातमी मिळाल्याने पंढरपूर शहर पोलीस ठाणेचे सपोनि अशिष कांबळे व सोबत पोहेकॉ प्रसाद आवटी, मपोहेका मोनिका पवार, पोकों शहाजी मंडले यांनी तेथे जावुन नमुद दोन्ही आरोपींना शोधुन अटक केले. तसेच सपोफौ शरद कदम, पोहेका सुरज हेंबाडे यांनी अनिकेत बबन कोरके यास पुणे येथुन तर पृथ्वीराज शिंदे यास अकलुज येथुन ताब्यात घेतले. कारवाई करीता सायबर विभागाचे पोकों रतन जाधव यांनी तांत्रीक मदत केली आहे. सदर गुन्हयाचा तपास अतुल कुलकर्णी, पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामीण, प्रितम यावलकर, अप्पर पोलीस अधिक्षक, सोलापूर ग्रामीण, यांचे मार्गदर्शनाखाली डॉ.अर्जुन भोसले, उप–विभागीय पोलीस अधिकारी सो, पंढरपूर उप विभाग पंढरपूर व त्यांची टिम सपोनि सागर कुंजीर, पोसई हमीद शेख, निलेश गायकवाड, पोहेकों बापुराव मोरे, अशोक भोसले, निलेश रोंगे, पोना राहुल लोंढे, विनोद शिंदे, पोकों सिताराम चव्हाण, स्वप्निल बागल इत्यादी पोलीस अधिकारी व अंमलदार करीत असुन सध्या अटक आरोपी पोलीस कोठडीत असुन गुन्हयाचा पुढील तपास वालु आहे.

# थोडक्यात

## अग्निशमन सेवा सप्ताह १४ ते २० एप्रिल दरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०९, डोंबिवली (ठाणे) :** मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात १४ एप्रिल ते २० एप्रिल २०२५ या कालावधीत अग्निशमन सेवा सप्ताह साजरा करण्यात येत आहे. १४ एप्रिल १९४४ रोजी मुंबई गोदीत एस. एस. फोर्ट स्टिकिंन या जहाजाला लागलेल्या आगीमध्ये प्राणांची आहुती देणाऱ्या ६६ अग्निशमन जवानांच्या स्मृती प्रित्यर्थ हा सप्ताह दरवर्षी पाळण्यात येतो.

या आठवड्या दरम्यान राज्यभरात अग्निशमन सेवांबाबत जनजागृती वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. शालेय विद्यार्थ्यांसाठी अग्निशमन प्रशिक्षण कार्यशाळा, चित्र स्पर्धा, फायर ड्रिल्स आणि प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्याचबरोबर अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांसाठी फायर ड्रिल स्पर्धा, चर्चासत्रे आणि व्याख्याने होणार आहेत. डोंबिवली छत्रपती शिवाजी महाराज चौक (पूर्वीचा घरडा सर्कल) या ठिकाणी अग्निशमन सेवा मधे वापरल्या जाणाऱ्या वस्तूंचा वापर कसा करावा यासाठी त्या ठिकाणी वस्तूचे प्रदर्शन भरवण्यात आले. त्यावेळी अनेक नागरिकांनी माहिती घेतली व चांगला प्रतिसाद दिला असल्याचे दिसून आले. राज्य सरकार आणि अग्निशमन विभागाच्या संयुक्त पुढाकाराने हा सप्ताह लोकसहभाग वाढविण्यासाठी आणि नागरिकांना आग लागल्यास आपत्कालीन परिस्थितीत वागण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. अधिक माहितीसाठी स्थानिक अग्निशमन केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## सुनिल शुक्ला यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी



**अक्षराज : विकास वाघ**

**दि.०९, धाराशिव :** गुढीपाडवा मेळाव्यामध्ये मराठी भाषेचा सन्मान व मराठी भाषेचा आदर केला पाहिजे तसेच महाराष्ट्र शासनाच्या प्रत्येक आस्थापनांमध्ये मराठी भाषेचा वापर व्हावा. मराठी भाषेचा दर्जा वाढवावा. या उद्देशाने राज ठाकरे यांनी प्रत्येक महाराष्ट्र शासन आस्थापनाला त्याची जाणीव करून द्यावी व हिंदी भाषेचा वापर कमी करुन राज्यात मराठी भाषेचा दर्जा वाढवावा व मराठी माणसांना न्याय देण्याबाबत सर्व महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षाच्या सैनिकांना या मेळाव्यामध्ये संबोधित केले. त्याच गोष्टीचा सुनील शुक्ला यांनी विपर्यास करून तमाम महाराष्ट्रामध्ये गैरसमज निर्माण केला व सन्माननीय आमचे नेते राज ठाकरे साहेबावरती खालची भाषा वापरली. यामुळे अशा महाराष्ट्र द्वेषी सुनील शुक्ला अध्यक्ष उत्तर भारतीय सेना यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करावा व कडक कारवाई करावी अशी मागणी येथील संतप्त सैनिकाच्यावतीने नुकतीच तहसीलदार कळंब, आदीसह मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना करण्यात आली आहे. या निवेदनावर कळंब मनसे तालुकाध्यक्ष गोपाळ घोगरे, तालुका सचिव सुरज बुधवंत, तालुका उपाध्यक्ष सलिम औटी, सैनिक यश वाघमारे, जिल्हा उपाध्यक्ष दत्ता भालचंद्र बोंदर धाराशिव सह आदींनी स्वाक्षऱ्या केलेल्या आहेत.

## धाराशिव खरेदी विक्री संघाच्या चेअरमन पदी उद्धवराव पाटील




**अक्षराज : विकास वाघ**

**दि.०९, धाराशिव :** आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली धाराशिव तालुका खरेदी–विक्री संघाची निवडणूक बिनविरोध पार पडली होती. आज रोजी बाजार खरेदी विकी संघाच्या नवीन पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड झाल्या. सर्वानुमते संघाच्या चेअरमन पदी उद्धवराव पाटील, वरुडा तर व्हाइस चेअरमन पदी ॲड. रामेश्वर शेटे, कोंड यांची निवड झाली. याबद्दल आमदार राणाजगजितसिंह पाटील, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, जिल्हाध्यक्ष संताजी पाटील यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या. नूतन चेअरमन पाटील व व्हा.चेअरमन ॲड.शेटे यांचा भाजपा कार्यालय, धाराशिव येथे प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी माजी जि.प.अध्यक्षतथा भाजपा जिल्हा संयोजक नेताजी पाटील, संतोष बोबडे, बालाजी गावडे, नाना कदम, नीलकंठ पाटील, पांडुरंग पवार, नूतन संचालक आणि प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

## नागरिकांना सुलभ, जलद गतीने पारदर्शक सेवा देण्याचा मानस - महापालिका आयुक्त

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.०९, कल्याण (ठाणे) :** नागरीकांना सुलभ व जलद गतीने पारदर्शक सेवा देण्याचा आपला मानस राहिल, असे प्रतिपादन आज नवनियुक्त महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी पत्रकारांशी झालेल्या वार्तालापात केले. महापालिकेतील प्रकल्पांना, विविध कामांना कशा प्रकारे गती देता येईल, याबाबत प्रयत्न करु. तसेच artificial intelligence च्या मदतीने नागरीकांचा सहभाग कसा वाढेल, प्रशासन जास्तीत जास्त लोकाभिमुख होण्याच्या दृष्टीकोनातून आपण प्रयत्न करु अशी माहिती त्यांनी दिली. शहर ही भारताचे भविष्य आहेत. त्यामुळे आपल्या शहरांच्या विकासासाठी पुढील २० वर्षांचे नियोजन करण्याच्या दृष्टीने तसेच आपल्या परिक्षेत्राचा अभ्यास करुन, त्यावर उपाय–योजना केल्या जातील. अशी माहिती देखील त्यांनी दिली. महापालिकेच्या पाणी पुरवठा योजना, आरोग्य व्यवस्था, शिक्षण यावर प्रामुख्याने लक्ष केंद्रीत केले जाणार असून मुख्यमंत्री महोदयांच्या १०० दिवसीय कृती आराखड्याच्या अनुषंगाने नागरीक हा केंद्र बिंदु ठेवून त्यांच्या समस्या व तक्रारींचे निराकरण करण्यासाठी प्रयत्न करु अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.